# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

## ◆विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना ◆

सप्रेम नमस्कार,

विद्यापीठामध्ये प्रथम वर्षाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सध्या सुरु असून लवकरच नियमित वर्गास प्रारंभ होणार आहे. आपल्या पाल्याचा शैक्षणिक प्रवास यशस्वी, सुरक्षित आणि सर्वांगीण विकास साधणारा ठरावा, यासाठी पालकांनी पुढील सूचना गांभीर्याने वाचून विचारात घ्याव्यात.

विद्यापीठ प्रशासनाकडून आपणांस नम्र आवाहन करण्यात येत आहे की, आपल्या पाल्याने विद्यापीठाच्या **वसतीगृहात (Hostel)** राहण्याचा पर्याय अवश्य निवडावा. विद्यापीठाच्या वसतीगृहामध्ये उच्च दर्जाच्या सुविधा, सुरक्षित वातावरण आणि शिक्षणार पुरक व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## ◆ वसतिगृह निवडण्याचे महत्तव व फायदे ◆

### १. संपूर्ण सोयी-सुविधांनी युक्त वसतिगृह:

विद्यापीठातील वसतिगृह हे आधुनिक आणि सुसज्ज असून त्यामध्ये स्वच्छ खोल्या, गुणवत्तापूर्ण जेवण, पिण्याचे शुध्द पाणी, २४ तास वीज, फर्निचर (पलंग, टेबल, खुर्ची), आणि इंटरनेट सुविधा, अभ्यासासाठी स्वतंत्र वाचनकक्ष, मनोरंजनाची साधने यांचा समावेश आहे.

### २. सुरक्षिततेची हमी:

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी २४x७ सुरक्षा रक्षक, निगराणी, तसेच आपत्कालीन वैद्यकीय सेवाही तत्परतेने उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थी व पालक यांचा मानसिक समाधानासाठी ही व्यवस्था अत्यंत उपयुक्त ठरते.

### ३. शैक्षणिक उपक्रमांमध्ये सुलभ सहभाग:

विद्यापीठामध्ये अनेक वेळा रात्रीच्या संत्रामध्ये प्रयोगशाळा, अतिरिक्त शिकवण्या, प्रोजेक्ट वर्क, अभ्यासगट वगैरे चालतात. घरून ये-जा केल्यास या उपक्रमांमध्ये सहभाग घेणे कठीण जाते.वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा सहज लाभ घेता येतो.

## ४. स्वावलंबन, शिस्त व एकाग्रता:

वसतिगृह जीवनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मनिर्भरता, वेळेचे व्यवस्थापन, शिस्त आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याची सवय विकसित होते. ही सवय त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यात फार उपयोगी ठरते.

## ५. समवयस्कांमध्ये राहून सामाजिक कौशल्यांचा विकास:

वसतीगृहात विविध भागांतून आलेले विद्यार्थी एकत्र राहत असल्याने आपुलकी, सहकार्य, संवादकौशल्य आणि सहिष्णुता यासारखे गुण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होतात.

## ◆पालकांना विशेष आवाहन◆

**आपल्या पाल्याचा शैक्षणिक व मानसिक विकास सुरक्षित आणि सुकर व्हावा, यासाठी वसतिगृहामध्ये राहणे अत्यंत आवश्यक व फायदेशीर आहे. त्यामुळे आपण आपल्या पाल्यास वसतिगृह निवडण्यास प्रोत्साहित करावे, ही नम्र विनंती.**

**आपल्या सहकार्याबद्दल आणि विश्वासाबद्दल विद्यापीठ प्रशासन आपले मन:पूर्वक आभार मानते.**

---

## मुलींसाठी वसतीगृह

- **धवलगिरी वसतिगृह**
  - ➢ प्रथम आणि दुसऱ्या वर्षाच्या डिग्री विद्यार्थिनींसाठी

## मुलांसाठी वसतीगृह

- **सहयागिरी वसतिगृह**
  - ➢ प्रथम वर्षातील डिग्री व डिप्लोमा(Advanced Diploma in Water Quality Management) तसेच थेट (Direct) दुसऱ्या वर्षातील डिग्री विद्यार्थ्यांसाठी
- **गगनगिरी वसतिगृह**
  - ➢ दुसऱ्या वर्षातील डिग्री तसेच डिप्लोमा विद्यार्थ्यांसाठी